महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत

एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/उपमव्य.(मासं-सेप्र)/No 07298 दिनांकः 5 AUG 2026

## सूचना

**विषय :-** जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड / प्रतिक्षा यादी तसेच ऑनलाईन परीक्षेतील गुणांबाबत.

**संदर्भः-**
१) महानिर्मिती जाहिरात क्र.०२/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्र.०२/२०२५ चे सुधारपत्र क्र.२४७९ दि.३०.०३.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.३३४३ दि.१६.०४.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.५०१५ दि.०५.०६.२०२५
५) महानिर्मिती सूचना क्र.५४१२ दि.१९.०६.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.११९२ दि.१०.०२.२०२६
७) महानिर्मिती सूचना क्र.५०५२ दि.०८.०६.२०२६

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीताची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाची दि.०९.०७.२०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती. वरील ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने व जाहिरात केलेल्या पदानुसार, उमेदवारांना कागदपत्रे जमा करण्याकरिता दि.२३.०२.२०२६ ते दि.२६.०२.२०२६ दरम्यान बोलविण्यात आले होते. कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा संदर्भिय क्र.०७ वरील सूचनेनुसार पार पाडण्यात आली आहे.

सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुण (७०% गुणप्रमाण) आणि वैयक्तिक मुलाखत परीक्षेतील प्राप्त गुण (३०% गुणप्रमाण) एकत्रित करुन जाहिरातीत नमूद सामाजिक व समांतर आरक्षणातर्गंत रिक्त पदांच्या अनुषंगाने अंतिम निकाल घोषित करण्यात येत आहे. सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेतील गुण व अंतिम निवड / प्रतिक्षा यादी प्राप्त करुन घेण्याकरीता उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाचे ऑनलाईन परीक्षेतील गुण.** ↵

**सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी.** ↵

टिपः-

१) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादी ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळाडू आरक्षण व शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून भविष्यात काही तफावत आढळल्यास संबंधित उमेदवारांची नियुक्ती किंवा उमेदवार रुजू झाल्यास नोकरीचा लाभ कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

२) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. सदरील यादी ही पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधिन राहून प्राप्त गुणानुसार तयार करण्यात आली आहे.

३) उपरोक्त पदांसाठी "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या आणि अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रकरणी, त्यांनी सादर केलेल्या "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS)प्रमाणपत्राची सखोल पडताळणी करण्यात येईल. सबब, संबंधीत सक्षम प्राधिकारी यांच्याकडुन प्राप्त अहवालानंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधित उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

४) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी विविध समांतर व सामाजिक आरक्षणातंर्गत अर्ज सादर केले असल्यास त्याबाबतचे जाहिरातीतील अटी व शर्ती तसेच शासनाने पारीत केलेले संबंधित आरक्षणातंर्गत नियम व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे उमेदवारांजवळ असणे ही संपूर्णत: उमेदवारांची जबाबदारी आहे.

५) सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) "अतिरिक्त कागदपत्रे पडताळणी आवश्यक" शेऱ्याअंतर्गत दर्शविण्यात आलेल्या उमेदवारांचा समावेश निवड / प्रतिक्षा यादीत असल्यास, अशा उमेदवारांच्या "खेळाडू प्रमाणपत्र" याबाबत मा.उप संचालक (क्रिडा व युवक सेवा) यांच्या कार्यालयाकडून पात्रतेबाबत निर्णय प्रलंबित असलेल्या उमेदवारांचा समावेश "अतिरिक्त कागदपत्रे पडताळणी आवश्यक" उमेदवारांच्या यादीत करण्यात आला आहे. वरील प्रमाणे संबंधित पडताळणी प्राधिकरणाच्या अहवालाच्या अधिन राहून नियुक्ती बाबत निर्णय घेण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच केवळ निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश असल्याने तात्काळ नियुक्ती देण्याबाबत कोणताही अधिकार संबंधित उमेदवारांना नसेल, याची देखील नोंद घ्यावी.

६) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णयानुसार गुणवत्ताधारक खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित विभागामार्फत करण्यात येईल व त्यानंतरच सदरील उमेदवारांना नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येईल.

७) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ व त्यानंतर पारीत केलेले त्यासंबंधीतचे इतर शासन निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गातून निवड/ प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रात, उमेदवाराचे स्वत:चे उत्पन्न असल्यास, स्वत:चे व कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न हे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी " (EWS) कमाल उत्पन्न मर्यादेच्या आत असल्याबाबत नमूद असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पडताळणीअंती "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना, उमेदवाराने खोटी माहिती अथवा पात्र नसताना देखील "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे निष्पन्न झाल्यास, उमेदवारास तात्काळ "अपात्र" ठरविण्यात येईल आणि सदरील उमेदवाराविरोधात भरतीच्या कोणत्याही टप्प्यात अथवा रुजू झाल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता मागास प्रवर्गातून बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीअंती प्राप्त एकूण गुणांनुसार (ऑनलाईन परीक्षा गुण ७०%+ वैयक्तिक मुलाखत गुण ३०%) त्यांची निवड खुल्या प्रवर्गातून होऊ शकते. तसेच खुल्या प्रवर्गातून कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची निवड वैयक्तिक मुलाखतीअंती त्यांना प्राप्त एकुण गुणांनुसार (ऑनलाईन परीक्षा गुण ७०% + वैयक्तिक मुलाखत गुण ३०%) संबंधीत उमेदवाराने अर्ज केलेल्या मुळ प्रवर्गातूनसुध्दा होऊ शकते, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) या पदाची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

१०) तसेच आर्थिक दुर्बल घटक या प्रवर्गातून अर्ज केलेले उमेदवारांच्या प्रकरणी निवड यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यांनी आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गाकरीता ते पात्र ठरतात किंवा कसे याबाबतची शहानिशा संबंधित सक्षम अधिकारी यांच्याकडे पडताळणी केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच नियुक्तीपत्र निर्गमित करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

११) वरील निवड / प्रतिक्षा यादी तयार करताना ज्या उमेदवारांस समान गुण प्राप्त झाले आहेत, अशा प्रकरणी शासन निर्णयानुसार वयाने जेष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सदरील बाब ही निवड झालेल्या उमेदवारांच्या सेवाजेष्ठतेतही लागू करण्यात येईल.

१२) वरील प्रतिक्षा यादी ही सूचना प्रसिद्ध केल्यापासून ०१ वर्षाकरीता वैध असेल. तसेच संबंधित प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ठ असल्याने, निवड यादीतील कोणताही उमेदवार अपात्र / रुजू न झाल्यास त्यांच्या जागी नियुक्ती देण्याबाबत उमेदवारांकडे कोणताही हक्क नसेल. त्याबाबतचा निर्णय महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१३) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.४८०४/२०२६ व रिट याचिका क्र.४७२८/२०२६ अन्वये याचिकाकर्त्यांची निवड झाल्यास मा.उच्च नयायालयाच्या अंतरीम आदेशानुसार उचित कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ (Asst.Chemist) पदाचा निकाल वर नमूद याचिकेंच्या अधिन राहुन निर्गमित करण्यात येत आहे.

१४) महानिर्मिती सूचना क्र.५०५२ दि.०८.०६.२०२६ नुसार ज्या उमेदवारांना "कागदपत्रे अतिरिक्त / पुन:पडताळणी आवश्यक" शेरा नमूद आहे, अशा उमेदवारांचा समावेश निवड / प्रतिक्षा यादीत असल्यास, सदरील उमेदवारांची नियुक्ती / पुढील कार्यवाही संबंधीत शासकीय / संस्थेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतरच करण्यात येईल.

**(धनाजी तोरस्कर)**
कार्यकारी संचालक (मासं)